
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष १० वे अंक ३ रा
ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २०१९



Scanned with OKEN Scanner




ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal
साहित्य, कला आणि
लोकसंस्कृतीला वाहिलेले

त्रैमासिक

# तिफण

वर्ष : दहावे, अंक : तिसरा
ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०१९

संपादक :
डॉ. शिवाजी भिकाजी हुसे
अतिथी संपादक :
डॉ. सुखदेव इघारे

संपादक मंडळ :
डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. प्रकाश खेत्री,
डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. कैलास दौंड,
प्रा. संजय भालेराव, प्रा. आर. व्ही. वाघमारे
डॉ. तुषार चांदवडकर, डॉ. राजेंद्र चौधरी,
डॉ. रामनाथ वाढे, शफी बोल्डेकर

मुखपृष्ठ : अक्षदा ॲडस्
मुद्रक : रुद्रायणी, औरंगाबाद.
मुद्रितशोधन : तत्सत
मुखपृष्ठ छायाचित्र : सोशल मिडियावरून साभार

अक्षर जुळणी, मांडणी व सजावट :
नीट एन्टरप्रायजेस, औरंगाबाद.
फोन : ८७८८४७५२०८

✲ वर्गणी ✲
वार्षिक : २००, पंचवार्षिक : १०००
वर्गणी अशीही भरता येईल –
संपादक, 'तिफण', बँक ऑफ महाराष्ट्र
शाखा कन्नड, खाते क्र. 60287405377
आय.एफ.सी. कोड क्र. MAHB0000259

स्वागत मूल्य : ५० रु.

संपादन : अवैतनिक

साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ताः
संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड – ४३१ १०३
ता. कन्नड, जि. औरंगाबाद.
मो. : ९४०४०००३९८
E-mail - huseshivaji@yahoo.com

(या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

# अनुक्रम


* संपादकीय ........................................................ ३
* राजकीय पटलावर शेतकरी ................................................ ५
  – डॉ. गणेश मोहिते
* साक्षेपी समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे ................................ ११
  – डॉ. महेश खरात
* गुलामगिरीतील संस्कृती संघर्षाचा अन्वयार्थ .......................... २०
  – केदार काळवणे
* वँडमास्तर ते शाळामास्तर ते साहित्यिक ............................... २७
  – अय्यूब पठाण लोहगावकर
* मैत्र जिवांचे ........................................................ ३१
  – प्रा. मीनल येवले
* संमेलनाध्यक्षांचे मनोगत ............................................... ३५
  – सुनील गायकवाड
* मराठी साहित्यातील स्त्रियांच्या आत्मकथनाचे स्वरूप
  आणि वेगळेपण ...................................................... ३८
  – प्रा. मीनाक्षी पाटील
* वहिणाबाई शिऊरकर यांच्या लेखनातून येणारे संत तुकारामांविषयीचे
  संदर्भ ............................................................... ४४
  – प्रा. बालासाहेब कटारे
* महानुभाव, संत व पंत वाङ्मयातील विनोद .............................. ५०
  – डॉ. सुखदेव इघारे
* वारकरी संप्रदायातील संतांची काव्यपरंपरा ............................ ५९
  – डॉ. सुषमा प्रधान घेवंदे
* मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी कविता :
  'तू जाऊन तीन तप झालीत' ......................................... ६५
  – डॉ. आप्पा दत्तू माने
* धनगरी लोकजीवनाचा सांस्कृतिक दस्तऐवज :
  'का धरिला परदेस' .................................................. ७२
  – डॉ. फुला बागूल
* कविता ............................................................ ७९–८०
  – डॉ. शांतीलाल चव्हाण, प्रा.डॉ. कृष्णा कदम, मेघराज मेश्राम


Scanned with OKEN Scanner

# गुलामगिरीतील संस्कृती संघर्षाचा अन्वयार्थ

– केदार काळवणे

महात्मा जोतिराव फुले हे आधुनिक भारताचे शिल्पकार आणि पर्यायी संस्कृतीचा कृतिकार्यक्रम देणारे, शोषणामुक्त समाजरचनेचे स्वप्न पाहणारे द्रष्टे विचारवंत आहेत. कृती व लेखनातून परंपरेची पुनर्मांडणी करणारे समाजसुधारक आणि लेखक आहेत. त्यांनी सामाजिक समतेचा आग्रह धरत आणि वंचितांच्या न्यायाची भूमिका घेत लोकशाही व्यवस्थेचा पाया घातला. शेती, पाणी, शिक्षण, उद्योग, अर्थ, धर्म, जात, इतिहास, स्त्री प्रश्न आदीसंबंधाने त्यांनी केलेले कार्य आणि व्यक्त केलेले विचार हे आधुनिक भारताच्या घडणीला दिशा देणारे आहेत. समकाली वास्तव आणि इतिहासाची चिकित्सा करत त्यांनी लिहिलेले साहित्य हे आधुनिक मूल्यविचार प्रकट करणारे मूलभूत सृजन आहे. सामाजिक न्याय हे मूल्य त्यांच्या संपूर्ण कार्याच्या केंद्रवर्ती आहे. या मूल्यांचा आग्रह धरत त्यांनी आधुनिक भारताची पायाभरणी केली. भारतीय समाज जीवनाच्या निकोप वाढीसाठी त्यांचे कृतिशील कार्यविचार उपयुक्त ठरलेले आहेत. वर्तमानातील सामाजिक प्रश्नही महात्मा फुले यांनी दिलेल्या कार्यक्रमपत्रिके आधारेच सुटू शकतात. त्यांच्या विचारांकडे दुर्लक्ष करून जागतिकीकरणोत्तर भारतातील विसंवाद आणि भेट संपणार नाही. चंगळवादी संस्कृती, सामाजिक संस्थांचे अधःपतन, शेती-शेतकरी-पाणी, स्त्रियांबद्दलची मानसिकता आणि जात-धर्माचा उन्माद यासह अनेकविध प्रश्नांना फुलेवाद हेच उत्तर आहे.

सामाजिक समता आणि न्यायाचे तत्त्व स्वीकारून त्यांनी देशाला दिलेली दिशा ही सर्वसमावेशक आहे. म्हणून ते आधुनिक भारताचे शिल्पकार ठरतात. ते खर्या अर्थाने महात्मा' होते. महात्मा' ही पदवी त्यांना कोणत्या राजवटीने वा शासनाने दिलेली नव्हती; तर सर्वसामान्य मुंबईकरांनी ११ मे १८८८ ला बहाल केली होती. भायखळ्याजवळील मांडवी कोळीवाडा येथील रघुनाथ महाराज सभागृहात आयोजित समारंभात हजारो आग्री, भंडारी, कोळी कामगार बंधूच्या साक्षीने सन्मानपूर्वक देण्यात आली. महात्मा जोतिराव फुले यांनी देशातील गुलामगिरी नष्ट करण्यासाठी जे अहोरात्र



Scanned with OKEN Scanner

कष्ट घेतले त्याचीच पावती म्हणून या घटनेकडे पाहता येईल. राजकीय हेतूने प्रेरित असल्या भारतरत्न' या किताबापेक्षा जनतेने दिलेली महात्मा' ही पदवी जोतिरावांचा यथोचित गौरव करणारी आहे. महात्मा गांधी यांनीही खरे महात्मा' जोतिरावच असल्याचा निर्देश केलेला आहे. तळसमूहांच्या उत्थानासाठी त्यांनी दिलेला सामाजिक लढा हा येथील शोषितांचा मुक्तिसंग्राम आहे. हा मुक्तिलढा ज्यांच्यासाठी होता अशा जनसामान्यांना ही पदवी त्यांना दिलेली आहे. म्हणून या पदवीला सामाजिक महत्त्व आहे. इ.स. १८४८ ते १८९० या बेचाळीस वर्षात महात्मा जोतिराव फुले यांनी कृती आणि लेखनातून जी चळवळ उभी केली, ती भारतीय सामाजिक स्वातंत्र्याचा जाहीरनामाच आहे. हाच जाहीरनामा या देशात लोकशाही रूजवण्यासाठी मोलाचा ठरलेला आहे. म्हणून भारतीय इतिहासातील फुले पर्व' महत्त्वाचे आहे.

आर्य-अनार्य (सुर-असुर) हा संघर्ष भारतीय समूहातला महत्त्वाचा संघर्ष आहे. परकीय आर्यांनी देशी अनार्यांच्या परंपरेला प्राचीन काळापासून नाकारत संस्कृती संघर्ष घडवत त्यांच्यावर वर्चस्व प्राप्त केले. धर्मधिष्ठित ज्ञानसत्ता आर्यांनी ताब्यात घेतल्याने आणि राजसत्ता धर्माच्या इशाऱ्यावर चालत असल्याने अनार्थ शोषणाचे बळी ठरले. धर्माच्या आडून वर्णव्यवस्थेची रचना समाजावर लादली गेल्याने हजारो वर्षे अनार्य गुलामगिरीत खितपत पडले. हाच संघर्ष अभिजन आणि बहुजन या नावानेही ओळखला जातो. अभिजन सर्व प्रकारच्या सत्तास्थानी आणि बहुजन या सत्तेच्या शोषणाचे बळी, असा हा संघर्ष आहे. बहुजनांच्या ज्ञान आणि कलानिर्मिती परंपरेला नाकारण्याचा प्रयत्न अभिजन परंपरेने सातत्याने केलेला दिसतो. बहुजनांचे सर्वप्रकारे दमन ही या व्यवस्थेची नीती राहिलेली आहे. बहुजनांना अंकित ठेवण्यासाठी धर्मग्रंथांचा आधार घेतला गेला. त्यात खोट्या गोष्टी घालून बहुजन समाजाला भेदरवत ठेवले की आपले वर्चस्व अबधित ठेवता येते हे अभिजनांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी वर्णव्यवस्थेच्या अघोरी धर्म व ज्ञानसत्ता आपल्या अधिकारात घेत बहुजनांना अज्ञानी ठेवून हजारो वर्षे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, मानसिक गुलाम केले.

बहुजनांच्या संस्कृतीचे विकृतिकरण करत तिचे अभिजनीकरण (ब्राम्हणीकरण) करण्याचा प्रयत्न झाला. अभिजनांनी प्रेक्षेपित केलेली संस्कृतीच आपली संस्कृती असल्याचे बहुजनांनाही वाटायला लागले. बहुजनांना अज्ञानी ठेवत अभिजनांनी आपला अजेंडा राबविण्याचा डाव यशस्वी केला. याची परखड आणि चिकित्सक मीमांसा आधुनिक आपला अजेंडा राबविण्याचा डाव यशस्वी केला. याची परखड आणि चिकित्सक मीमांसा आधुनिक काळात प्रथमच महात्मा जोतिराव फुले यांनी केली.



Scanned with OKEN Scanner

त्यांचे संपूर्ण कार्य आणि लेखन हे अभिजनांचा बुरखा फाडणारे आणि बहुजनांना सत्याची जाणीव करून देणारे असे आहे. यादृष्टीने त्यांच्या इतर लेखनाबरोबरच इ.स. १८७३ ला प्रकाशित झालेला 'गुलामगिरी' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. या ग्रंथातून धर्माच्या आधारावर ब्राह्मणी संस्कृतीने कशा प्रकारे बहुजनांची पिळवणूक केली याची तर्कसंगत मिथक मीमांसात्मक मांडणी महात्मा फुले यांनी केलेली आहे. सोळा भागांत विभागलेल्या या ग्रंथाच्या पहिल्या नऊ भागांत ब्राह्मणी वर्चस्वाच्या इतिहासाची चिकित्सा केलेली आहे. पुढील सात भागांत सुधारणावादी ब्रिटीश राजवटीतही कशा प्रकारे अन्याय-अत्याचार केले गेले याची वस्तुस्थिती नोदवली आहे. ग्रंथाच्या शेवटी भट कामगार कशा रीतीने शोषण करतात, याची पोवाडा आणि अभंगांच्या माध्यमातून मीमांसा येते. एकंदरीत हा ग्रंथ बहुजनांना ब्राह्मणी व्यवस्थेने गुलाम करत आपली संस्कृती त्यांच्यावर लादली याची पोलखोल करून वास्तव समोर आणणारा आहे.

महात्मा जोतिराव फुले यांच्या गुलामगिरी' या ग्रंथाचे भारतीय सामाजिक इतिहासातील महत्त्व लक्षात घेऊन डॉ. साहेबराव हिवाळे यांनी या ग्रंथाचे संस्कृती आणि सामजिकतेच्या परिप्रेक्ष्यात आकलन 'म.फुले यांचा संस्कृती संघर्षवाद आणि समाज पुनर्रचना विचार' या संशोधकीय ग्रंथलेखनातून मांडले आहे. या ग्रंथाचे शीर्षकच अर्थपूर्ण आणि अर्थगर्भ आहे. या ग्रंथातील विवेचनातून महात्मा फुले यांच्या गुलामगिरी' चे मूलगामित्व डॉ. हिवाळे यांनी तटस्थपणे अधोरेखित केलेले आहे. या ग्रंथाला संशोधनाची शिस्त आहे. या ग्रंथाची विभागणी प्रास्तविक आणि समारोपासह सहा प्रकरणांत करण्यात आलेली आहे. महात्मा फुले यांच्या एकूण विचारांवर दृष्टीक्षेप टाकत 'गूलामगिरी' ग्रंथातील विचारांचे अंतरंग सम्यकपणे विश्लेषित करण्याचा मूलभूत प्रयत्न या अभ्यासातून झालेला आहे. महात्मा फुले यांनी सांस्कृतिक अवकाशात अभिजन संस्कृतीचा उघड केलेला कावेबाजपणा आणि बहुजन संस्कृतीची विशद केलेली रूपरेखा यांचा समर्पक वेध डॉ. हिवाळे यांनी घेतलेला आहे. त्यांनी भारतीय संस्कृतींतील चर्चिलेले ताणेबाणे, ब्राह्मणी वर्चस्व संघर्ष आणि बहुजन संस्कृतीचा झालेला संकोच याची सूक्ष्मपणे मीमांसा प्रस्तुत अभ्यासातून येते. महात्मा फुले यांच्या गुलामगिरी' ग्रंथाने बहुजन संस्कृतीला प्रकाशात आणुन भारतीय समाजाच्या जीवन रीतीची दिशा बदलली. ही जीवनरीत लोकशाही मूल्यांवर अधारलेली होती. त्यांच्या लेखनामुळे प्रस्थापित मूल्यविषयक सामाजिक मानदंडांबद्दल पुनर्विचार करण्याचे चलनवलन सुरू झाले. म्हणून डॉ. हिवाळे यांनी या अभ्यासात महात्मा जोतिराव फुले यांच्या समाज पुनर्रचना विचारांची केलेली मीमांसा महत्त्वाची ठरणारी आहे.



Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले यांचे विचार : एक दृष्टिक्षेप' या प्रकरणात महात्मा फुले यांच्या समग्र जीवन धारणनेचा, विचारधारेचा आणि कार्याचा स्थूल आढावा घेत त्यांच्या सामाजिक क्रांतीचा करून दिलेला परिचय पायाभूत स्वरूपाचा आहे. त्यांच्या विचारांची प्रासंगिकता अणि अपरिहार्यताही यातून ध्वनित होते. "१९ व्या शतकातील महत्मा फुले एक महान क्रांतिकारक होत. भारतातील सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा फुले आहेत. आधुनिक काळात सामाजिक क्रांतीचा विचार सर्वप्रथम महात्मा फुले यांनीच मांडला. शूद्रातिशूद्र, स्त्री शिक्षण, भटशाही, शेतीविषयक समस्या अशा महत्त्वाच्या सामाजिक पैलूंविषयी महात्मा फुले यांनी मोलाचे विचार मांडून त्यास कृतीची जोड दिली होती." (पृ. क्र. १९) ही महात्मा फुले यांच्या कार्याची महती नि व्यापकता लक्षात घेऊन डॉ. हिवाळे यांनी या प्रकरणांची मांडणी केलेली आहे. हजारो वर्षे गुलाम असलेल्या समाजाला समतेच्या प्रवाहात आणण्याची नितांत गरज निर्माण झालेली होती. ते ब्रिटिश राजवटीत घडू शकते असा विश्वास समाजधुरिणांमध्ये निर्माण झाला होता. कारण ब्रिटिश राजवट ही विज्ञानवादी आणि सुधारणावादी चळवळींना अवकाश प्राप्त करून देणारी होती. या राजवटीतील बहुजनांची, ज्यांचे माणूसपण नाकारले होते अशा सर्व समूहांची तत्कालीन स्थिती भयावह आणि विदारक होती. म्हणून या सार्या समूहांच्या हिताचा व्यापक लढा उभा करण्याची गरज होती. ही गरज ओळखून महात्मा फुले यांनी त्यांच्या उत्थानाची चळवळ हाती घेतली. शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रियांसह जे जे तळसमूह आहेत त्यांना मुख्य धारेत आणण्याच्या ध्येयाने त्यांनी लेखन-विचार-कृतीच्या माध्यमातून समाजकार्याला प्रारंभ केला. त्यातून या देशात समाजक्रांती घडली. याचे समकालीन प्रश्न आणि परिस्थितीची चिकित्सा करत केलेले विश्लेषण मूलगामी स्वरूपाचे आहे. यासोबतच महात्मा फुले यांच्या समाज परिवर्तन कार्यातील योगदानाची केलेली चर्चा अणि गुलांमगिरी ग्रंथातील विचार व वर्तमान समाज या अनुषंगाने केलेले भाष्यही महत्त्वाचे आहे.

ब्राह्मण लोकांच्या दास्यासपासून शूद्र देधबांधवांना मुक्त करण्यासाठी गुलामगिरी ग्रंथातील विचार कामी यावेत असा या ग्रंथ निर्मितीचा हेतू महात्मा फुले यांनी विशद केलेला आहे. राजसत्तेचा धाक आणि धर्म-रूढींच्या आधारे शूद्रातिशूद्रांना बांधून टाकत त्यांना गुलाम करण्यात ब्राह्मणी व्यवस्था जेव्हा यशस्वी झाली; तेव्हा त्यांचे जीवन अत्यंत हीन पातळीवर गेले. त्यातले माणूसपण नष्ट होऊन ते वस्तूपातळीवर गेले. शारिरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक अशा सर्व प्रकारच्या गुलामीत ते जखडले गेल्याने जीवन म्हणून त्यांचे अस्तित्त्वच नष्ट झाले. या विदारक स्थितीतून शोषित समूह



Scanned with OKEN Scanner

बाहेर पडावेत यासाठी ब्राह्मणी व्यवस्थेने केलेल्या लबाड्या आणि लुबाडणुकीचा समाचार महात्मा फुले या ग्रंथातून घेतात. या ग्रंथाचा भर मुख्यतः ब्राह्मणी धर्माचे सामाजिक-सास्कृतिक शोषणाचे राजकारण उघड करणे हा आहे. ज्योतिबा आणि धोंडिबा यांच्या संवादांतून हा ग्रंथ चर्चात्मक पद्धतीने साकारतो. महात्मा फुले यांचे यांचे गुलामगिरी ग्रंथातील विचार' या प्रकरणात प्रस्तुत लेखकाने गुलामगिरी ग्रंथाचे अंतरंग महात्मा फुले यांच्या ग्रंथनिर्मिती भूमिकेतून तपासत यथोचित विवेचन केलेले आहे. सोळा भागांत विभागलेल्या गुलामगिरीचे आकलन डॉ. हिवाळे यांनी विभागनिहाय मांडल्यामुळे विश्लेषणात अधिक स्पष्टता आलेली आहे. सर्वसामान्य वाचकांना गुलामगिरी हा ग्रंथ समजून घेण्याच्या दृष्टीने हे प्रकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यातील सुलभ विवेचन पद्धतीमुळे ते अधिक वाचनीय झालेले आहे. बहुजनांच्या पराभवाची नि गुलामीची महात्मा फुले यांनी चर्चिलेली कारणमीमांसा नेमकेपणाने लेखकाने विवेचित केल्याने या लेखनाची मौलिकता वाढलेली आहे.

मानवी जगण्याच्या प्रवाहात साकारलेली विशिष्ट जीवनरीत म्हणजे स्थूलपणाने संस्कृती म्हणता येईल. त्यामध्ये भौतिक-अभौतिक बाबींचा समावेश असतो. जेव्हा मूळ संस्कृतीवर दुसरी एखादी संस्कृती आक्रमण करत वर्चस्व प्रस्थापित करते; तेव्हा संस्कृती संघर्ष तर घडतोच, शिवाय संस्कृती संकर आणि संक्रमणही होते. सांस्कृतिक वैविध्य हे जरी भारतीय समाजाचे वैशिष्ट्ये असले तरी अभिजन आणि बहुजन अशा दोना प्रमुख संस्कृतीचा मोठा संघर्ष या देशात राहिलेला आहे. हा संघर्ष जित आणि जेत्यांमधील संघर्ष आहे. बहुजन ही देशी आणि अभिजन ही परकीय संस्कृती आहे. परकीय संस्कृतीने देशी संस्कृती ताब्यात घेऊन तिमधील सांस्कृतिक प्रतीके नष्ट करण्याचा प्रयत्न करत स्वप्रतीके लादण्यापचा अजेंडा राबवल्याने मोठा संस्कृती संघर्ष या देशात घडला. त्यामुळे देशी संस्कृती झाकली जाऊन परकियांना निर्मिलेली अभिजनी संस्कृतीच खरी संस्कृती असल्याचे भासवण्यात ब्राह्मणी व्यवस्था यशस्वी झाली. या कारस्थानाला येथील बहुसंख्य गुलाम समूह बळी पडले. याचा तर्कनिष्ठ व युक्तिवादपूर्ण परामर्श घेत महात्मा फुले यांनी बहुजनांच्या खऱ्या संस्कृतीला या ग्रंथाच्या माध्यमातून प्रकाशात आणले आहे. गुलामगिरी ग्रंथातील संस्कृती संघर्ष' या प्रकरणात डॉ. हिवाळे यांनी याची मूलभूत मीमांसा केलेली आहे. या संघर्षाला असणाऱ्या विविध दृष्टिकोनाची आणि संदर्भाची सम्यक पडताळणी करत केलेले हे लेखन गुलामगिरीतील विचारशीलता अधिक ठळक करणारी आहे. महात्मा फुले यांनी बहुजनांच्या संस्कृतीची ऐतिहासिकतेच्या नजरेतून पाहणी करत व्यक्त केलेल्या विचाराची यशोचित मांडणी डॉ. हिवाळे यांनी



Scanned with OKEN Scanner

केलेली आहे.

भारतीय समाज व्यवस्था ही विषमतेवर आधारलेली तिमध्ये मूठभरांचे हित आणि त्यांच्याकरवी बहुसंख्यांचे होणारे शोषण अशी स्थिती होती. भारतीय समाज संरचना ही हिंदू धर्मास आणि तिमधील जातीवर आधारलेली असल्याने जात हाच प्रमुख घटक या विषमतेला कारणीभूत होता. ही व्यवस्था साखळदंडांनी जखडून टाकल्यासारखी झाल्याने बहुजनांचे जगणे अत्यंत गलितगात्र झाले होते. म्हणून या समाज व्यवस्थेला भेदून स्वात्र्यांवर आधारलेल्या नव्या समाज पुनर्रचनेची आवश्यकता होती. ती महात्मा फुले यांनी ब्रिटिश राजवटीच्या पूर्वार्धात करून नव्या युगाचा आरंभ केला. या कार्याची चिकित्सा करणारे महात्मा फुले यांचे समाज पुनर्रचनेचे विचार' हे एक महत्त्वाचे प्रकरण प्रस्तुत लेखनात समाविष्ट आहे. प्रस्थापित समाज व्यवस्थेची लोकशाहीवादी आणि पुनर्रचना करण्याच्या दृष्टीने महात्मा फुले यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा आढाव यात घेण्यात आलेला आहे. त्यांनी दिलेल्या पर्यायी समाज व्यवस्थेची दिशा कशा प्रकारची आहे अणि ती कशी अखिल भारतीयांच्या हिताचे आहे याची वस्तुनिष्ठ मांडणी येथे करण्यात आलेली आहे. महात्मा फुले यांनी धर्माधिष्ठित समाज व्यवस्थेची केलेली पुनर्रचना, वर्ण-जात व्यवस्थेवर केलेला हल्ला, हिंदू धर्म व धर्मग्रंथांतील उघड केलेला मतलबीपणा आणि त्याला सार्वजनिक सत्यधर्माचा दिलेला पर्याय, प्रथा-परंपरांना केलेला प्रखर विरोध, निर्मिक संकल्पनेची केलेली मांडणी, शैक्षणिक सार्वत्रिकीकरणाचा धरलेला आग्रह या अनुषंगाने डॉ. हिवाळे यांनी केलेली चर्चा म. फुले यांच्या समतावादी समग्र समाज व्यवस्थाविषयक परिवर्तनशील विचारांना नेमकेपणाने स्पष्ट करणारी आहे.

'गुलामगिरी' या ग्रंथातील महात्मा जोतिराव फुले यांचा संस्कृती संघर्षवाद आणि समाज पुनर्रचना विचार समजून घेण्याच्या दृष्टीने हे लेखन अत्यंत उपयुक्त ठरले आहे. संशोधनाची शिस्त या लेखनाला असल्याने त्याचे मोल वाढलेले आहे. महात्मा फुले यांच्या विचारांच्या आकलनातील अचूकता, वस्तुस्थितीवर आधारलेली निरीक्षणे आणि त्यांच्या लेखनाची इतिहास व वर्तमान परिप्रेक्षात केलेली पाहणी हे या लेखनाचे महत्वाचे विशेष आहेत. तटस्थ आणि ससंदर्भ विवेचन पद्धतीमुळे लेखनाची विश्वसनीयता वाढलेली आहे. महात्मा फुले यांच्या लेखनाला विविध ज्ञानशाखांचा आधार आहे. त्यामुळे त्यांचे लेखन समजून घेणे ही सोपी गोष्ट नाही. परंतु डॉ. परंतु डॉ. हिवाळे हे लेखन समजून घेण्यात कोणत्याही गफलती केलेल्या दिसत नाहीत. "त्यांना समताधिष्ठित आणि शोषणविरहित समाजरचनेची निर्मिती अपेक्षित होती." (पृ. क्र. ९१) याप्रकारे महात्मा फुले यांच्या लेखनाचे यथार्थ आणि अपेक्षित विश्लेषण केलेले आहे. त्यामुळे



Scanned with OKEN Scanner

हे ग्रंथभाष्य फुले अभ्यासात नवी भर टाकणारे आहे. तसेच वर्तमानात या विचाराची आवश्यकता आणि प्रासंगिकता आधोरेखित करणारे आहे.

(सदर लेखनासाठी 'म.फुले यांचा संस्कृती संघर्षवाद आणि समाज पुनर्रचना विचार,' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, ०५ ऑगस्ट २०१९, पहिली आवृत्ती आधाराला घेतली आहे. कसांत दिलेले पृष्ठ क्रमांक याच आवृत्तीतील आहेत.)

***

**– केदार काळवणे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, शिक्षण महर्षी ज्ञानदेव
मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद
मो. ७०२०६३४५०२ kedar.kalwane@gmail.com



Scanned with OKEN Scanner